# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : २१/०४/२०१६

<u>प्रसिध्दीकरिता</u>

# घाणेकर नाट्यगृहातील पडझडीबाबत ‘धर्मराज्य पक्षा’ची तीव्र निदर्शने

<u>ठाणे (प्रतिनिधी), दि. २१</u> : गडकरी रंगायतनंतर ठाण्याच्या कलाक्षेत्रात नावारूपाला येत असलेले डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह आता ठाणे महापालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे पुरते बदनाम झाले असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी ही सत्ताधारी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांची असल्याची जोरदार टीका ‘**धर्मराज्य पक्षा**’ने केली आहे. घाणेकर नाट्यगृहातील बाल्कनीचे पीओपी कोसळून झालेल्या दुर्घटनेचा निषेध करण्यासाठी, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाबाहेर ‘**धर्मराज्य पक्षा**’चे ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे यांच्या नेतृत्त्वाखाली गुरूवारी तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

दरम्यान, अवघ्या चार वर्षापूर्वी उभारण्यात आलेले डॉ. काशिनाथ नाट्यगृह शुभारंभापासून असुविधांच्या गर्तेत सापडल्याने वादग्रस्त ठरले होते. २०१२ च्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर घाईघाईने उद्घाटनाचा घाट घालणारे सत्ताधारी आणि नाट्यगृहातील दुरवस्थेकडे दुर्लक्ष करणारे प्रशासकीय अधिकारीच या दुर्घटनेला सर्वस्वी जबाबदार असल्याचा आरोप विनोद मोरे यांनी यावेळी केला. ठामपा आयुक्तांनी घाणेकर नाट्यगृहाच्या पडझडीबद्दल चौकशीचे आदेश दिले असले; तरी, या दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या उभारणीस वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याचीदेखील तपासणी करावी, अशी ठाम मागणी ‘**धर्मराज्य पक्षा**’चे ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे यांनी शेवटी केली.

याप्रसंगी पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष नरेंद्र पंडित, सचिन शेट्टी, धर्मराज्य शिक्षक-पालक-विद्यार्थी संघटनेचे सचिव प्रा. भरत जाधव, धर्मराज्य महिला संघटनेच्या समन्वयक स्वप्नाली पवार, सचिव साक्षी शिंदे, सहसचिव दर्शना पाटील, नवी मुंबई शहर अध्यक्षा शितल कोळी, सदस्या पौर्णिमा सातपुते, ज्येष्ठ कार्यकर्ते दिनेश खोल्लम, ठाणे शहर विधानसभा सहसचिव दिनेश चिकणे, प्रभाग क्र.२४ चे प्रभाग अध्यक्ष राजू शिंदे, प्रभाग क्र.१४ चे प्रभाग अध्यक्ष महेश क्षिरसागर, युवा कार्यकर्ते संदिप सोनखेडे आदी मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

————-////—————-

ए/ए२०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*